# प्रेस नोट

## बसमध्ये लोकांचे मोबाईल चोरी करणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

मा.पोलीस निरीक्षक श्री सतिश निकम सो यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ कार्यक्षेत्रातील बंडगार्डन पो.स्टे.चे हद्दीत युनिट २ चे अधिकारी व कर्मचारी चेन स्नॅचिंग करणारे गुन्हेगारांचा शोध घेणे व सदर प्रकारचे गुन्ह्यांना प्रतिबंध करणेकामी पेट्रोलींग करत असताना पोना अतुल गायकवाड यांना त्यांचे बातमीदार मार्फत खात्रीशिर बातमी मिळाली की, आंबेडकर पुतळा बसस्टॉप येथे एक इसम चोरीचे मोबाईल विक्री करीता आला असून तो मोबाईल घेता का असे विचारत आहे. तेव्हा पोहवा २३४१ खरात, पोना ४१३९ गायकवाड, पोना १०७७ भिलारे, पोना ३०४२ मेंगे, असे सदर ठिकाणी गेले असता एक चॉकलेटी रंगाचा नक्षी असलेला शर्ट व निळे रंगाची जिन्स पॅन्ट घातलेला इसम लोकांना त्याचे हातातील मोबाईल दाखवून त्याचेशी बोलत असल्याचे दिसल्याने बातमीदाराकडून खात्री केली असता सदरचाच संशयीत इसम असल्याचे समजल्याने त्यास जागीच छापा टाकून ताब्यात घेतले त्यावेळी त्याचेकडे एकूण हातामध्ये एक सॅमसंग गॅलेक्सी ऑन ५ व पॅन्टचे खिशामध्ये एक पॅनेसॉनिक, एक सॅमसंग व एक नोकीया कंपनीचे ३ मोबाईल असे एकूण ४ मोबाईल मिळून आले. त्यावेळी त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव नागेश विष्णू कांबळे वय ३०, रा. स.नं. १०८/१०९ रामनगर, अंध शाळेसमोर रामटेकडी हडपसर पुणे असे सांगितले. त्याचे हातात असलेल्या व खिशातील मोबाईल बाबत त्याचेकडे चौकशी करता त्याने सदरचा मोबाईल जिल्हाधिकारी कार्यालया बसस्टॉप येथून बस मध्ये चढण्याऱ्या प्रवाश्याचा चोरल्याचे सांगितले. तसेच इतरही मोबाईल बसमधील प्रवाश्याचे, रेल्वेस्टेशन परिसरातून चोरी केल्याचे सांगितल्याने त्याबाबत मिळालेल्या मोबाईलचे आयएमईआय नंबरवरुन खात्री केली असता सदर बात बंडगार्डन पोलीस स्टेशन गु.र.नं. ३३१/२०१६, भादवि क. ३७९ व गु.र.नं. १६/२०१७, भादवि क. ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदरचे गुन्हे आरोपीने केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरचा सराईत इसम हा बसमधील प्रवाश्यांचे मोबाईल चोरी करत असल्याचे खात्री झाल्याने त्याचेकडे सखोल चौकशी करता त्याने आणखीन ०८ मोबाईल चोरी केल्याचे कबुल करुन सदरचे मोबाईल हे ५०० ते १००० रुपयास ओळखीचे लोकांना विकल्याचे सांगितल्याने त्याप्रमाणे लक्ष्मण कांबळे, मिना चव्हाण, योगेश पवार, महेश भोंगळे, प्रमोद पांढरे रा. वैदुवाडी हडपसर यांचेकडून एकूण ०८ मोबाईल हस्तगत करण्यात आलेले आहेत.

अशा प्रकारे पी.एम.टी. बस मधून मोबाईल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास ताब्यात घेवून त्यांचेकडून ५९,५००/- रुपयाचे १२ मोबाईल हॅन्डसेट हस्तगत करुन गुन्हे शाखा युनिट २ कडील अधिकारी कर्मचारी यांनी बंडगार्डन पोलीस स्टेशन कडील २ चोरीचे गुन्हे उघडकीस आणलेले असून आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

वरील प्रमाणे कारवाई मा. दिपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे मा. पी.आर. पाटील, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, मा. सुरेश भोसले, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे १, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक सतिश निकम, पोलीस कर्मचारी दिपक खरात, अतुल गायकवाड, विशाल भिलारे, अतुल मेंगे यांनी केलेली आहे.


युनिट २, गुन्हे शाखा